## कार्यकारी सारांश

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा हा अहवाल, महालेखाकार (लेखापरीक्षा-II), महाराष्ट्र, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या शासकीय विभाग आणि महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थांच्या अनुपालन लेखापरीक्षणातून उद्भवणाऱ्या बाबींशी संबंधित आहे.

लेखापरीक्षणाचे महत्त्वाचे परिणाम राज्य विधिमंडळाच्या निदर्शनास आणणे हा या अहवालाचा प्राथमिक उद्देश आहे. लेखापरीक्षणाच्या निष्कर्षांमुळे कार्यकारीणीला सुधारात्मक कृती करण्यास सक्षम करणे आणि धोरणे आणि निर्देश तयार करणे अपेक्षित आहे ज्यामुळे संस्थेच्या कार्यचालन कार्यक्षमतेत आणि वित्तीय व्यवस्थापनात सुधारणा होईल व प्रशासनाला सुद्रुढ करण्यास हातभार लागेल.

या अहवालात **'महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरण' या विषयावरील एक विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण,** एक **'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' या विषयावरील माहिती तंत्रज्ञान लेखापरीक्षण** आणि पाच **स्वतंत्र लेखापरीक्षण परिच्छेदांचा** समावेश आहे.

### 'महाराष्ट्र भरपाई वनीकरण व्यवस्थापन आणि नियोजन प्राधिकरणाचे' विषय-विशिष्ट अनुपालन लेखापरीक्षण

महाराष्ट्रात 50,858 चौरस किमी वनक्षेत्र आहे. ज्यामध्ये 9,865.62 चौरस किमी अतिशय दाट जंगल, 21,577.79 चौरस किमी मध्यम घन जंगल आणि 19,415.12 चौरस किमी खुले जंगल आहे. कोणत्याही विकास प्रकल्पासाठी वनजमिनीची आवश्यकता असल्यास, वापरकर्ता संस्थेला पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडून (एमओईएफ ॲन्ड सीसी) मंजुरी घ्यावी लागेल आणि एमओईएफ ॲन्ड सीसी द्वारे विहित केलेल्या राज्य भरपाई वनीकरण निधीमध्ये भरपाई वनीकरणा साठी रकमेच्या स्वरूपात भरपाई द्यावी लागेल. महाराष्ट्र भरपाई वनीकरण नियोजन आणि व्यवस्थापन प्राधिकरण (महा-कॅम्पा) हे वनजमिन गैर-वन वापरासाठी वळवल्यामुळे जंगल आणि झाडांचे नुकसान भरपाई करण्यासाठी भरपाई वनीकरण उपक्रम राबवुन राज्य भरपाई वनीकरण निधीचे व्यवस्थापन आणि वापर करेल.

ऑगस्ट 2024 ते फेब्रुवारी 2025 या कालावधीत 2019-20 ते 2023-24 या कालावधीसाठी महा कॅम्पा वरील एसएससीए घेण्यात आला. एसएससीएचे निष्कर्ष, शिफारशींसह, खाली दिलेले आहेत:

- महा कॅम्पा भरपाई वनीकरण अंतर्गत नियोजित उपक्रमांपैकी केवळ 47.37 *टक्के* साध्य करू शकले आणि वार्षिक संचालन योजना (एपीओ) तयार करण्यात, सादर करण्यात आणि मंजुरी देण्यात झालेल्या विलंबामुळे एपीओ मध्ये मंजूर रकमेच्या केवळ 42.48 *टक्के* रक्कम खर्च होवु शकली.
- 11 विभागांमधील 60 प्रकल्पांमध्ये, वळवण्यात आलेल्या 4,168.01 हेक्टर वनजमीनसाठी, भरपाई वनीकरण हे अपेक्षित असलेल्या बिगर-वनजमीनऐवजी 3,777.33 हेक्टर वनजमिनीवरच नियोजित/पूर्ण केले गेले.
- चुकीच्या जागेची निवड आणि मंजूर जमीन इतर वृक्षारोपण योजनांसाठी वळवल्यामुळे 2,592.73 हेक्टर जमिनीवरील भरपाई वनीकरण हाती घेता आले नाही.
- मार्च 2024 पर्यंत, भरपाई वनीकरणासाठी प्राप्त झालेली 5,727.243 हेक्टर बिगर-वन जमीन राखीव वन किंवा संरक्षित वन म्हणून अधिसूचित केली गेली नव्हती, त्यामुळे ती 'भारतीय वन कायदा, 1927' च्या कायदेशीर संरचनेतुन आणि संरक्षणातून बाहेर राहिली.
- ₹ 94.69 कोटीचा कॅम्पा निधी अर्थसंकल्प योजनांच्या अंमलबजावणीसाठी अनियमितपणे वळवला. अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनी एपीओमध्ये नसलेली ₹ 40.37 कोटीची कामे अनधिकृतपणे केली.
- वापरकर्ता एजन्सींकडून राष्ट्रीय प्राधिकरणाला भरपाई वनीकरणासाठी रकमेचे अनियमित प्रेषण आणि जमा केलेल्या रकमेच्या विलंबित प्रेषणासाठी ₹ 40.80 कोटीचे राष्ट्रीय प्राधिकरणाकडून व्याज न मिळणे.
- महा-कॅम्पाने गोरेवाडा प्राणीसंग्रहालयात रेस्क्यू सेंटर (प्राणी बचाव केंद्र) उभारण्यासाठी 2021-22 आणि 2022-23 या कालावधीत महाराष्ट्र वन

विकास महामंडळाला ₹ 5.50 कोटी सीएएफ नियम, 2018 चे उल्लंघन करून वितरित केले.

- नियामक मंडळ निष्क्रिय होते आणि सुकाणू समिती व कार्यकारी समितीने नियमित बैठका न घेतल्यामुळे महा-कॅम्पाच्या कार्यकलापावर अपुरी देखरेख झाली.

**लेखापरीक्षण शिफारस करते की:**

- *महा-कॅम्पाने निर्धारित वेळेनुसार आणि जबाबदारीसह एक अंतर्गत नियोजन दिनदर्शिका तयार करावी जेणेकरून निर्धारित देय तारखांना राष्ट्रीय प्राधिकरणाकडे एपीओ सादर केले जातील आणि मंजूर वेळापत्रकानुसार निधी जारी केला जाईल.*
- *विभागाने संयुक्त स्थळ तपासणी आणि भू-संदर्भाच्या आधारे योग्य बिगर-वन जमिनीची सत्यापित भु-बँक तयार आणि कार्यान्वित करावी, जेणेकरून विहित केलेल्या एक वर्षात किंवा दोन हंगामात भरपाई वनीकरण वेळेवर पूर्ण होईल.*
- *सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 4 नुसार वापरकर्ता संस्थांद्वारे सर्व भरपाई वनीकरण मिळकत राष्ट्रीय कॅम्पा निधीत जमा करणे बंद करून थेट राज्य कॅम्पा निधीमध्ये जमा केल्या जातील याची खात्री करण्यासाठी शासनाने आवश्यक निर्देश जारी करावे.*
- *महा कॅम्पाने एक औपचारिक गुंतवणूक धोरण तयार करावे व अंमलात आणावे आणि अतिरिक्त शिल्लक सीएएफ अधिनियम, 2016 च्या कलम 26 आणि 30 नुसार शासकीय प्रतीभुती किंवा शेड्यूल्ड बँकांच्या मुदत ठेवींमध्ये गुंतवणुक करावी.*
- *महा कॅम्पाच्या नियामक मंडळ, सुकाणू समिती आणि कार्यकारी समितीच्या बैठकी विहित कालावधीमध्ये बोलावल्या जाव्या आणि देखरेख व अंतर्गत नियंत्रणे मजबूत करण्यासाठी भौतिक प्रगती, निधीचा वापर आणि अभिलेख देखभालीचा आढावा घेण्याचे आदेश दिले जावे.*

**'एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली' चे माहिती तंत्रज्ञान (आयटी) लेखापरीक्षण**

1996-1997 पासून महाराष्ट्र शासनाने त्यांच्या विभागांसाठी विविध मॉड्यूल विकसित करून संगणकीकरण सुरू केले. भारत सरकारने (मे 2007) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाद्वारे एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (आयएफएमएस) अंमलात आणण्याचे निर्देश दिले.

महाराष्ट्र शासनाने एप्रिल 2008 पासून अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि देखरेख कार्ये, शासनाच्या खर्चाचा लेखाजोखा आणि कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनासह इतर वैयक्तिक दाव्यांचे स्वयंचलितीकरण करण्याची कारवाई सुरू केली. ही कार्ये पाच वेब-सक्षम मॉड्यूलच्या विकासासह स्वयंचलित आणि एकत्रित केली गेली. महाकोश पोर्टल वित्त विभागाने विकसित केलेल्या विविध अनुप्रयोगांच्या लिंक्स प्रदान करते. आयएफएमएस मध्ये सामान्यत: अर्थसंकल्प, ट्रेझरी, बिल/पेमेंट प्रक्रिया, प्राप्ती लेखा, निवृत्तीवेतन व्यवस्थापन, सेवार्थ मॉड्यूलद्वारे वेतन व्यवस्थापन हे मॉड्यूल आहेत ज्यामध्ये पाच उप-मॉड्यूल आहेत.

आयएफएमएस वरील आयटी लेखापरीक्षण 2018-19 ते 2023-24 या कालावधीत हाती घेण्यात आले. आयटी लेखापरीक्षणाचे निष्कर्ष खाली सारांशित केले आहेत:

- लेखापरीक्षणामध्ये सेवा स्तर करार (एसएलए) मध्ये नमूद केलेल्या प्रमुख घटकांच्या अंमलबजावणीमध्ये त्रुटी आढळून आल्या. परफॉर्मन्स मॉनिटरिंग टूल्स (पीएमटी) आणि पॅकेज की इन्फ्रास्ट्रक्चर विकसित आणि तैनात करण्यात अयशस्वी झाल्यामुळे प्रकल्प देखरेख आणि डेटा सुरक्षा दोन्हीशी तडजोड झाली.
- आयएफएमएस इन्फ्रास्ट्रक्चर मध्यवर्ती होस्ट केलेले आणि भौतिकदृष्ट्या सुरक्षित असले तरीहि, परवाना नसलेल्या सॉफ्टवेअरचा वापर, सॉफ्टवेअर इंस्टॉलेशनवर निर्बंधांचा अभाव आणि युएसबी सारख्या बाह्य उपकरणांचा अनिर्बंध इत्यादीमुळे क्लायंट पातळीवर असंवेदंशील/भेद्य होते.
- मुख्य कार्यप्रणाली (की मॉड्यूल्स) मध्ये द्वि-घटक प्रमाणीकरण आणि एन्क्रिप्शनचा अभाव, पासवर्ड धोरणांची अपुरी अंमलबजावणी, वापरकर्ता खाते लॉकआउट यंत्रणेचा अभाव आणि अयोग्य भूमिका व वापरकर्ता

व्यवस्थापन यासारख्या अनेक गंभीर सुरक्षा आणि प्रवेश नियंत्रणात कमकुवतपणा होत्या.

- लेखापरीक्षणामध्ये वापरकर्ता स्तर आवश्यकतांचे अपुरे मूल्यांकन आढळून आले, ज्यामुळे बिल तयार करण्यासाठी मानवीय हस्तक्षेप झाला.
- विविध मॉड्यूल्समध्ये डेटा अखंडतेमध्ये काही कमतरता आहेत उदा., मास्टरमध्ये परिभाषित नसलेल्या अनुदान प्रकारातील वस्तूंवर मंजुरी, प्रमाणीकरण नियंत्रणे उदा., विशेषतः अद्‌वितीय संमिश्र की मर्यादा.
- ही प्रणाली मास्टर आणि ट्रान्झॅक्शनल डेटामधील महत्त्वपूर्ण संदर्भिय एकात्मकता तपासणीची अंमलबजावणी करत नाही. मास्टर टेबल्समधील डुप्लिकेट नोंदी, नोंदणीकृत नसलेल्या किंवा दुबार लाभार्थ्यांच्या दाव्यांवर प्रक्रिया करणे आणि संदर्भीय व संयुक्तिक की बंधनांचा अभाव यामुळे आर्थिक व्यवहारांच्या विश्वासार्हतेशी तडजोड झाली.
- विभागाने आयएफएमएस मॉड्यूल्सच्या प्रभावी आणि कार्यक्षम वापरासाठी प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण केले नाही. नियतकालिक प्रशिक्षणाचा अभाव आपत्ती पुनर्प्राप्ती (डीआर) योजनांच्या प्रभावीतेबद्‌दल चिंता निर्माण करतो.

**लेखापरीक्षण शिफारस करते की:**

- *प्रकल्पाच्या उर्वरित घटकांची पूर्तता सुनिश्चित करावी.*
- *महाराष्ट्र ई-गव्हर्नन्स धोरण 2011 नुसार तार्किक प्रवेश नियंत्रणे असावीत.*
- *आयएफएमएसच्या कामगिरीचे नियमितपणे मूल्यांकन करण्यासाठी एक मजबूत अभिप्राय यंत्रणा सुनिश्चित करावी.*
- *डेटा अखंडतेसाठी पुरेसी अनुप्रयोग नियंत्रणे असावीत.*

## इतर अनुपालन लेखापरीक्षा निरीक्षण

### पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाच्या लेखापरीक्षणादरम्यान, आढळून आलेले प्रमुख लेखापरीक्षण निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

- 'सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील 53 गावांना पाणी पुरवठा' बाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल चुकीचा बनविल्यामुळे ₹ 94.39 कोटींचा वायफळ खर्च आणि पाणी पुरवठा योजना भौतिकरित्या पूर्ण होऊनही सुरू न होणे.
- महावितरणाचे ₹ 7.77 कोटी थकीत असल्याने बाधीत झालेल्या विद्‌युत पुरवठ्यामुळे बीड पाणी पुरवठा योजनेसाठी खरेदी केलेली पंपिंग यंत्रसामग्री निष्क्रिय राहिली आणि ₹ 97.28 लाखांचा खर्च निष्फळ ठरला.

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेखापरीक्षणादरम्यान, आढळून आलेले प्रमुख लेखापरीक्षण निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:

- स्थानिक संस्था, नगरपरिषदा आणि इतर शासकीय विभागांकडून, सविस्तर आराखडे, अंदाजपत्रके तयार करण्यासाठी किंवा तांत्रिक मान्यता देण्यासाठी, आकारण्यात येणाऱ्या ₹ 21.73 कोटी शुल्काचे, सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांमध्ये अनियमित वितरण.
- सवलत करारात तरतुद नसताना टप्प्याच्या शीघ्र साध्यतेसाठी सवलतधारकाला ₹ 1.34 कोटी बोनसचे अनियमित प्रदान.

**संचालक, विमान वाहतूक (सामान्य प्रशासन विभाग)**

संचालक, विमान वाहतूक (सामान्य प्रशासन विभाग) यांच्या लेखापरीक्षणादरम्यान प्रमुख लेखापरीक्षण निष्कर्ष खालीलप्रमाणे आढळले:

- एच-145 हेलिकॉप्टरसाठी देखभाल, दुरुस्ती आणि तपासणी एजन्सीच्या नियुक्तीला विलंब झाल्यामुळे ₹ 2.07 कोटींचा टाळता येण्याजोगा खर्च.